# विद्यापीठात क्विक हिल सायबर क्लबचे उद्‌घाटन

## सायबर सुरक्षिततेवर राहणार भर; ३० विद्यार्थ्यांची सायबर वॉरिअर्स म्हणून निवड



**सोलापूर :** सायबर क्लबच्या उद्‌घाटनप्रसंगी कुलगुरु डॉ. प्रकाश महानवर, डॉ. लक्ष्मीकांत दामा, डॉ. विकास घुटे आदी.

**सोलापूर, ता. ६ :** पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठातील संगणकशास्त्र संकुल व क्विक हिल फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने 'सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा' हा उपक्रम राबविला जातो. या अंतर्गत विद्यापीठात सायबर क्लबचे उद्‌घाटन विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. प्रकाश महानवर यांच्या अध्यक्षतेखाली व क्विक हिल फाउंडेशनच्या प्रमुख अनुपमा काटकर यांच्या उपस्थितीत पार पडले.

समाजातील विविध घटकामध्ये सायबर गुन्हेविषयी माहिती दिली जाते. तसेच अशा प्रकारचे गुन्हे टाळण्यासाठी विविध उपाययोजना सेमिनारव्दारे सांगितले जाते. जसे की ओटीपी कोणास सांगु नये, स्ट्राँग पासवर्ड वापरावा, सोशल मिडीयावर आलेले मेसेजेस व लींकची शहानिशा करावी व आपली माहिती, ही आपली जबाबदारी असे सांगितले जाते. क्विक हिल फाऊंडेशनने या वर्षी हा उपक्रम राबविण्यासाठी संकुलातील ३० विद्यार्थ्यांची सायबर वॉरीयर्स म्हणून निवड केली आहे. तसेच ४ विद्यार्थ्यांची सायबर क्लब ऑफीसर्स म्हणून निवड केली आहे. त्यात मालती जाधव (प्रेसीडेंन्ट), सायली शेळके (सेक्रेटरी), शंकुतला बेल्ले (कम्युनिटी डायरेक्टर) व सुप्रीया शिंदे (मिडिया डायरेक्टर) यांची निवड केली आहे. या उपक्रमाद्वारे 'सायबर वॉरीयर्समध्ये व्यक्तिमत्वाचा विकास होऊ शकते, असे मत क्विक हिल फाऊंडेशनचे अजय शिर्के यांनी मांडले.

सुरवातीस संकुलाचे संचालक प्रा. डॉ. विकास घुटे यांनी प्रास्ताविक केले. प्र-कुलगुरू डॉ. लक्ष्मीकांत दामा, डॉ. आर. एस. मेंते,डॉ. ए. आर. शिंदे, डॉ. एस. डी. राऊत, डॉ. जे. डी. माशाळे, संदीप पोटे, सुधीर वाघमारे आदी उपस्थित होते.